अत्याधुनिक फर्निचर व गिफ्ट आर्टिकल्स चे सर्वांग सुंदर दालन
Nilkamal श्री अॅम्बीयन्स फर्निचर अॅन्ड इंटेरियर मॉल BAJAJ FINSERV
सोमवार बंद
■ सोफा सेट ■ डायनिंग टेबल ■ बेडरुम सेट ■ ऑफिस फर्निचर ■ स्टिल अलमारी ■ टि टेबल, मंदिर ■ गिफ्ट आर्टिकल्स
एकनाथपुरम, शंकर नगर, अमरावती Ph.0721-2677002

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

७६ वर्ष स्नेह, विश्वास आणि परंपरेचे

www.dainikhindusthan.com
marathevinod62@gmail.com
epaper.dainikhindusthan.com

60 वर्षापासून विश्वासाचे प्रतीक
GST दर कमी फायदा जास्त!! त्वरित खरेदी करा..!
GST FESTIVE DHAMAKA
मॉडर्न इलेक्ट्रीक मॉल
रुख्मिनी नगर, अमरावती
8600050015

■ वर्ष ७६ वे/अंक ८५ वा ■ ■ अमरावती, बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर २२ कार्तिक १९४७ ■ ■ पृष्ठे १६ ₹ ४.०० ■

किलो प्रमाणे मिळेल
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत
सागर प्लास्टिक
100% होलसेल भावात
प्रो. प्रा. आकाश प्रकाशराव शिरभाते
मल्टी मॉल
चित्रा चौक, फुटाणा लाईन, अमरावती
इस से सस्ता और अच्छा कही नही
8184057777
9822032885
ग्रिन नेट चे होलसेल विक्रेता
किलो प्रमाणे मिळेल ९९९ च्या खरेदरवर आकर्षक उपहार मोफत

# शिवसेना कुणाची शिंदे की ठाकरेंची?

## सर्वोच्च न्यायालयात आज अंतिम सुनावणी




मुंबई दि. ११ : महापालिका निवडणुका तोंडावर आहेत.. अशात खरी शिवसेना कुणाची? असा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेला आलाय.. त्याला कारण ठरलयं... १२ नोव्हेंबरला शिवसेना पक्ष आणि चिन्ह या वादावर सर्वोच्च न्यायालयात होणारी अंतिम सुनावणी.. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु आहे.. त्यामुळे सुनावणीत एकनाथ शिंदे यांचे विमान सर्वोच्च न्यायालय जमिनीवर पाडणार का? हे लवकरच कळेल असा खोचक टोला कायदेतज्ज्ञ असीम सरोदेंनी लगावलाय...

गेल्या ३ वर्षांपासून शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादाचा खटला सुरु आहे.. अशातच न्यायाधीश सूर्यकांत १२ नोव्हेंबरला होणाऱ्या सुनावणीत नेमका काय निकाल देतात? याकडे दोन्ही पक्षाचं लक्ष लागलयं... मात्र आता तरी अंतिम निकाल लागणार का .. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर काय परिणाम होणार? की पुन्हा तारीख पे तारीख ...? याकडे राज्याचं लक्ष लागलंय..

# बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्यात ६७.१४ टक्के मतदान

पाटणा दि. ११ : बिहार विधानसभा निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातील मतदान सायंकाळी ६ वाजता संपले. तथापि, रांगेत उभे असलेले मतदार मतदान करू शकतील. ४,१०९ संवेदनशील बूथवर सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली.

शेवटच्या टप्प्यात २० जिल्ह्यांमधील १२२ जागांवर सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६७.१४% मतदान झाले. मुस्लिमबहुल किशनगंजमध्ये सर्वाधिक ७६.२६% मतदान झाले.

बंपर मतदानाबाबत केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी यांनी दावा केला की, ते दुसऱ्या टप्प्यात १२२ पैकी ८० जागा जिंकतील. तेजस्वी यादव म्हणाले की, लोक मोठ्या संख्येने मतदान करत आहेत. मी भारावून गेलो आहे.

**निवडणुकीचे ठळक मुद्दे**

ईव्हीएममध्ये बिघाड झाल्यामुळे बांका येथील कटोरिया येथील ७६ क्रमांकाच्या बूथवर अद्याप मतदान सुरू झालेले नाही.

ईव्हीएममध्ये बिघाड *(उर्वरित पान २ वर)*

# चंद्रशेखर बावनकुळे भाजपाचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी

## ५१ टक्के मते घेऊन महायुतीचा विजय निश्चित



मुंबई दि. ११ : महसूलमंत्री व माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भारतीय जनता पार्टीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून निवड करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नावाची घोषणा केली.

बावनकुळे म्हणाले, महाराष्ट्रात महायुतीच्या माध्यमातून ५१ टक्के मते घेऊन दोन-तृतीयांश बहुमताने महाराष्ट्राच्या सर्व निवडणुका जिंकू. राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व जिल्हा परिषद आणि नगरपालिका, नगरपंचायती यामध्ये भाजप-महायुती ही प्रचंड बहुमताने विजयी होईल असा मला विश्वास आहे.

मंगळवारी सकाळी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली भाजपाच्या महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या जिल्हा प्रभारींची बैठक झाली. या बैठकीस पक्षाचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, राज्यातील विविध भागातील संघटन मंत्री, महामंत्री, मंत्रीमंडळातील मंत्री उपस्थित होते.

तब्बल तीन तास राज्यातील सर्व निवडणुकांचे विभागनिहाय सादरीकरण बैठकीत करण्यात आले. मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रभाऱ्यांना जास्तीत जास्त महायुतीवर भर देण्याच्या, मित्रपक्षांवर टीका-टिप्पणी न करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. यानंतर प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांची भाजपाचे महाराष्ट्र निवडणूक प्रभारी म्हणून घोषणा केली.

बावनकुळे म्हणजे की, महायुतीत समन्वय टिकवण्यासाठी प्रयत्न केले जातील. या समन्वयासाठी प्रत्येक जिल्ह्यात तीन मंत्र्यांची समिती असेल. यामध्ये एक भाजप, एक शिवसेना आणि एक राष्ट्रवादी असे तीन मंत्री समन्वयक म्हणून काम करणार आहेत. महायुतीतील मित्रपक्षांमध्ये कुठेही मतभेद आणि मनभेद होणार नाही याची काळजी भाजप घेईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# छत्तीसगडमध्ये ६ नक्षलवादी ठार

बीजापूर दि. ११ : छत्तीसगडच्या बीजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी मंगळवारी सकाळी चकमकीत ६ नक्षलवाद्यांना ठार केले. तसेच, त्यांच्याकडून इन्सास रायफल, स्टेनगन, ३०३ रायफल आणि मोठ्या प्रमाणात स्फोटक साहित्य जप्त करण्यात आले आहे.

बीजापूरचे जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. जितेंद्र यादव यांनी सांगितले की, राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात माओवादी हालचालींची माहिती मिळाल्यानंतर, डीआरजी बीजापूर, डीआरजी दंतेवाडा आणि एसटीएफ या संयुक्त पथकाला नक्षलविरोधी मोहिमेसाठी रवाना करण्यात आले होते. सकाळी सुमारे १० वाजल्यापासून *(पान २ वर)*

# सत्तेसाठी एकत्र आलेले तीन साप एकमेकांना गिळू पाहताहेत : उद्धव ठाकरे



मुंबई दि. ११ : राज्यात सर्पाकार स्थिती निर्माण झाली आहे. महायुती सरकारमध्ये सत्तेसाठी साठमारी सुरू असून तेथे तीन साप एकत्र बसले आहेत. या सापांच्या शेपट्या एकमेकांच्या तोंडात आल्या आहेत. ते सगळेच एकमेकांना गिळायला बसले आहेत. हे असे प्रकार सुरू झाल्यानंतर जनतेकडे पाहणार कोण, अशी टीका शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील कुंडलिक खांडे यांनी पुन्हा शिवसेनेत (ठाकरे) प्रवेश केला. खांडे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचे उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेत स्वागत केले. यावेळी त्यांनी खांडे यांना चूक सुधारल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. चूक झाली तर समजू शकतो पण अपराध होता कामा नये. एखाद्या वेळी *(उर्वरित पान २ वर)*

# इस्लामाबादमध्ये भीषण स्फोटात १२ जणांचा मृत्यू

इस्लामाबाद दि. ११ : पाकिस्तानमधील इस्लामाबादमध्ये भीषण स्फोट झाल्याची घटना समोर आली आहे. या स्फोटात १२ जणांचा मृत्यू झाला असून २० पेक्षा जास्त जण गंभीर जखमी झाले आहेत. एका वाहनात हा स्फोट झाल्याचं सांगितलं जात आहे. या स्फोटाच्या घटनेला पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी आत्मघातकी हल्ला म्हटल्याचं सांगितलं जात आहे.

इस्लामाबादमधील एका न्यायालयीन संकुलाजवळ मंगळवारी उभ्या असलेल्या एका कारमध्ये अचानक भीषण स्फोट झाला आणि मोठ्या प्रमाणात आग लागली. या *(उर्वरित पान २ वर)*

# दिल्ली बॉम्बस्फोट: सीसीटीव्ही मध्ये पुलवामाचा डॉक्टर कारमध्ये

नवी दिल्ली दि. ११ : सोमवारी संध्याकाळी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १ जवळ झालेल्या स्फोटाचा दहशतवादी हल्ल्याशी संबंध असल्याचे दिसून येत आहे. ज्या पांढऱ्या ह्युंदाई आय२० कारमध्ये स्फोट झाला त्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. मेट्रो स्टेशनच्या पार्किंगमधून बाहेर पडताना कारमध्ये काळा मास्क घातलेला एक माणूस बसलेला दिसत होता.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हा व्यक्ती मोहम्मद उमर नबी आहे, जो व्यवसायाने डॉक्टर आहे. स्फोटापूर्वी तो कार चालवताना दिसला होता. उमर हा काश्मीरमधील पुलवामा येथील रहिवासी आहे. सुरक्षा यंत्रणांना उमर हरियाणातील फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलशी संबंधित असल्याचा संशय आहे. *(उर्वरित पान २ वर)*

# अमरावती महापालिकेच्या ४४ जागा महिलांसाठी

## अ. जाती १५ तर जमाती २, नामाप्रसाठी २३ जागा; मनपाच्या २२ प्रभागांचे आरक्षण जाहीर




अमरावती दि.११ : होऊ घातलेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी २१ प्रभागातील प्रत्येकी चार जागांचे तर १ प्रभागातील तीन जागांचे आरक्षण मंगळवारी महापालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आले.

मनपाच्या डॉ. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात ईश्वर चिठ्ठीव्दारे काढण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीमध्ये एकूण २२ प्रभागातल्या ८७ जागांपैकी अनुसूचित जाती१५, जमाती २, नागरिकाच्या मागास प्रवर्ग २३ तर उर्वरित जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित आहे. विशेष म्हणजे एकूण जागांपैकी ४४ जागा सर्व प्रवर्गातील महिलांसाठी राखीव आहेत.

प्रभाग निहाय आरक्षण पुढील प्रमाणे, प्रभाग १ - शेगांव- रहाटगांव (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग २ - संत गाडगेबाबा पीडीएमसी (अ) अ.जा., (ब) ना.मा.प्र. महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ३ - नवसारी (अ) अ.जा. महिला राखीव, (ब) ना.मा.प्र., (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ४ - जमिल कॉलनी - लालखडी (अ) ना.मा.प्र., (ब) सर्वसाधारण महिला राखीव, (क) सर्वसाधारण महिला राखीव, (ड) सर्वसाधारण, प्रभाग ५ - महेंद्र कॉलनी - नवीन कॉटन मार्केट (अ) *(उर्वरित पान २ वर)*

### मनपा आयुक्तांच्या उपस्थितीत चिमुकल्यांनी काढल्यात ईश्वर चिठ्ठी

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे संदर्भाधीन पत्रानुसार अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी सोडतीचा कार्यक्रम आज दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, महानगरपालिका, अमरावती येथे पार पडला.

सदर सोडत कार्यक्रमात जेवड येथील महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थी वर्ग ४ था 'अ' मधील कु. विरा अंकुश हनवते, कु. मसिरा शेर खान, सम्यक सुनील कटकतलवारे तसेच वर्ग ४ था 'ब' मधील कु. ईश्वरी गोपाल कराळे आणि युवराज प्रदीप मते या विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या.

सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी आरक्षण सोडत कार्यक्रमाची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेकडून करण्यात आली.

या सोडत कार्यक्रमास अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ.मेघना वासनकर, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी तसेच नागरिक उपस्थित होते.

# दिल्ली बाँब स्फोटातील जबाबदार असलेल्या प्रत्येक आरोपीचा शोध घेण्याचे अमित शाहंचे आदेश



नवी दिल्ली दि. ११ : दिल्लीतील लाल किल्ला परिसरात काल (सोमवार) सायंकाळी एका कारमध्ये भीषण स्फोट झाला या स्फोटात ९ जणांचा मृत्यू झाला आहे. यांनतर या घटनेमागील सर्व आरोपींना पकडण्यासाठी जोरदार प्रयत्न केले जात आहेत. यादरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर दिल्ली कार स्फोटाच्या तपासाचा आढावा घेण्यासाठी एक उच्च-स्तरीय बैठक घेतली.

या बैठकीत झालेल्या चर्चेबद्दल शाह यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत माहिती दिली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर दिल्ली कार स्फोटाचा आढावा घेण्यासाठी बैठका घेतल्या. या घटनेसाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक आरोपीचा *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




मी आता मोठा झालो आहे त्यामुळे श्रीखंड नाही तर भूखंड खायचा आहे असे म्हणत आहे हा...

# अकोला दंगलप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून स्वतःच्याच आदेशावर स्थगिती



अकोला दि. ११ : शहरात १३ मे २०२३ रोजी झालेल्या दंगलीप्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकावर सर्वोच्च न्यायालयाने आपल्या आधीच्या आदेशावरच स्थगिती दिली आहे. ११ सप्टेंबर रोजी दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने तपासाची निष्पक्षता राखण्यासाठी डखढ मध्ये हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समुदायांतील अधिकाऱ्यांचा समावेश करण्याचे निर्देश दिले होते. या आदेशावर महाराष्ट्र सरकारने हरकती घेत, गणवेशधारी पोलिस अधिकाऱ्यांकडे धर्म किंवा जात या दृष्टिकोनातून पाहणे चुकीचे असल्याचे म्हटले होते. सरकारने न्यायालयास सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने इच्छेनुसार स्वतःच्या अधिकाऱ्यांसह नवे एसआयटी गठीत करावे, मात्र धर्माच्या आधारावर नियुक्तीचा निकष रद्द करावा. मुख्य न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या *(पान २ वर)*

# बिहारमध्ये एनडीए सुस्साट, महागठबंधनची पिछेहाट; पोल ऑफ पोल्सचा अंदाज

पाटणा दि. ११ : बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज जवळपास सगळ्याच एक्झिट पोलमधून वर्तवण्यात आला आहे. बिहारमध्ये यंदा दोन टप्प्यात मतदान झालं. ६ आणि ११ नोव्हेंबरला मतदारांनी त्यांचा कौल दिला. १४ नोव्हेंबरला निकाल जाहीर होणार आहे. एक्झिट पोलमधील आकडे पाहता सत्ताधारी एनडीएला स्पष्ट बहुमत मिळेल असा अंदाज आहे. राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्त्वात लढणाऱ्या महागठबंधनला झटका बसण्याची शक्यता आहे.

बिहारमध्ये यंदा बंपर मतदान झालं आहे. मॅटराईझच्या एक्झिट पोलनुसार एनडीएला १४७ ते १६७ जागा मिळण्याचा अंदाज आहे. तर महागठबंधनला ७० ते ९० जागा मिळतील अशी शक्यता आहे. राज्यात विधानसभेच्या एकूण २४३ जागा असून सत्ता स्थापनेसाठी १२२ जागांची *(पान २ वर)*

मराठवाड्याचा प्रसिध्द सुरती हुरडा
दीपक देवचंद आप्पा
आमचा नवीन पत्ता पन्नालाल नगर बगीच्या समोर
M. 9422857286

Amit R. Bijwe Mob.: 9422917360
FISH O FISH AQUARIUM
Up to 20% Discount
Dog Food & Accessories
Birds Cages
Fishes • Fancy Imported Tank • Aquarium Accessories
• Pedigree • Royal Canin • NGD • Whiskas • SmartHeart • Me-O
Ganesh colony, Shilangan Road, (Ravi Nagar Road) Amt. ☎ : 2562939

DAIKIN एअर कंडिशनर्स
₹ 5999/- डाउन पेमेंट पर
अधिकृत विक्रेता-
केडिया
C/o केडिया मॉल, श्रीकृष्णपेठ मो. 9049912413

जे.के.फर्निशींग
• सोफा कापड • फोम गादी • सोफा गादी
• पीव्हीसी कार्पेट • कुशन • लोड • पडदे
Sleepwell
जयस्तंभ चौक, अमरावती, मो. ९६८९५०९३३४, ९१४६०९९१९६

संपूर्ण लग्न बस्ता
आराधना होलसेल शॉपिंग मॉल
• बनारसी शालू • डिझायनर साड्या • घाघरा ओढनी • सलवार सुट
• ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सँडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. © 2574594
L -2, बिझीलॅन्ड, नांदगावपेठ, अमरावती.

■ www.dainikhindusthan.com ■ फोन : २६६०४२९/२६६६४६४ ■ फॅक्स ०७२१-२६६३३६० ■ इ-मेल : dainikhindusthanpress@gmail.com ■ आर.एन.आय.क्र. ११४२०/५७ ■ पोस्टल रजि.नं. ए.एमटी./आर.एन.पी./८५/२०१८-२०२० ● अमरावती ● यवतमाळ ● अकोला ● बुलढाणा ● वाशिम